प्रेस नोट ता. १३/०६/२०१९

## हडपसर पोलीसांकडून दरोडयातील पाहिजे आरोपीस अटक

पुणे शहरातील वाहन चोरी, जबरी चोरी व घरफोडी चोरीच्या गुन्हयास प्रतिबंध करुन, चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरीता मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त सो, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली व मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त सो, हडपसर विभाग पुणे यांचे सुचनानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव यांचेकडून हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीतील चोरीच्या गुन्हयास आळा बसविण्याकरीता तसेच पाहिजे आरोपीबाबत विशेष मोहिम राबविण्यात आली आहे.

मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रघुनाथ जाधव यांचे मार्गदर्शनाखाली हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीत तपास पथकाचे अधिकारी स.पो.नि. चव्हाण व तपास पथकातील स्टाफसह हडपसर पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेप्रतिबंधक पेट्रोलींग करीत असताना फिरत फिरत हडपसर गाव पुणे येथे आलो असता पो.ना. गायकवाड व पो.ना. शिवले यांना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ३३७/२०१९ भादविक ३९९,४०२, आर्म ॲक्ट कलम ३(२५), ४(२५), महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५ मधील पाहिजे आरोपी नामे रोहित तानाजी सोनकांबळे, वय २० वर्षे, रा. अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे हा गंगानगर, फुरसुंगी, पुणे येथील रिक्षा स्टँड जवळ येणार असलेबाबत बातमी मिळाली. त्यानंतर स.पो.नि.चव्हाण व तपास पथकातील स्टाफसह गंगानगर फुरसुंगी, पुणे येथील रिक्षा स्टँड जवळ सापळा लावुन पाहिजे आरोपी रोहित तानाजी सोनकांबळे यास पकडले. त्यावेळी पाहिजे आरोपी रोहित तानाजी सोनकांबळे याची अंगझडती घेतली असता एक लोखंडी कोयता मिळुन आल्याने तो दाखल गुन्हयाचे तपासकामी जप्त करुन ताब्यात घेण्यात आला आहे.

पाहिजे आरोपी नामे रोहित तानाजी सोनकांबळे, वय २० वर्षे, रा. जगताप डेअरी शेजारी, कपडयाचे लाँड्री जवळ, इंदलकर यांचे घरात भाडयाने, अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे यास दाखल गुन्हयात दिनांक १०/०६/२०१९ रोजी १८.४५ वाजता अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार यांचे सुचनानुसार सहा. पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, सहा. पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे, पो.हवा. ८२३ युसुफ पठाण, पो. हवा. ५५६२ राजेश नवले, पो. ना. २८०० प्रताप गायकवाड,पो.ना.५८९४ टिळेकर पो. ना. ६४८९ विनोद शिवले, पो. ना. ६८७० सैदोबा भोजराव, पो. शि. ८६९२ अकबर शेख, यांनी केली आहे.